# न्यायनिर्णय
## (दि.०६ फेब्रुवारी, २०२४)

या प्रकरणातील अभियोगपक्षाचे कथन व पुरावा लक्षात घेता खालील मुद्दे न्यायनिर्णयाकरीता माझे विचारार्थ उपस्थित झाले. ते मुद्दे करण्यात आलेल्या चर्चेवरुन आलेल्या निष्कर्शासह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. अभियोगपक्ष हे शाबीत करतो काय की, दि.१६.०८.२०२२ रोजी १७:३० वाजताचे दरम्यान मौजा–दहेगाव गोंडी येथे आरोपीने १७ लि. गावठी मोहा दारु अवैधरित्या विक्रीसाठी बाळगतांना आढळून आले ? | : | नाही. |
| २. आदेश काय ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे. |

### – कारणमिमांसा –

### मुद्दा क्र.१ बाबत

२. आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने फक्त पंच भास्कर सुखेदवराव कालोकार (अ.सा.१) यांना तपासले. नि.१ वरील आदेशानूसार अभियोगपक्षाच्या पुराव्याची बाजू बंद करण्यात आली. आरोपीविरुध्द त्याला गुन्हयात गुंतविणारा पुरावा न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–३१३ अन्वये बयाण नोंदविण्यात आले नाही.

३. भास्कर सुखदेवराव कालोकार (अ.सा.१) या पंच साक्षीदाराने त्याच्या साक्षीत पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही, असे सांगीतले आहे. त्याने आपल्या साक्षीव्दारे त्याच्या पूर्व कथनारुप साक्ष न दिल्याने सरकारी वकीलांनी त्याला उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु त्यामध्ये प्रकरणाच्या दृष्टीने काहीही महत्वपूर्ण आले नाही. त्यामुळे सदरील साक्षदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

४. उपरोक्त पुराव्यावरुन घटनास्थळावर नेमके काय घडले, याबाबत पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. अभियोगपक्षाने पंचनामा शाबीत केलेला नाही. त्यामुळे सदरील प्रकरणातील गावठी मोहा दारु ही आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आले होते, हे शाबीत होत नाही. तसेच नमुन्यासाठी मुद्देमालापैकी काही मुद्देमाल वेगळा काढण्यात आला होता, या बाबी सांगणारा मुद्देमाल वाहून नेणाऱ्या कोणत्याही साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. सबब, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा घटनास्थळावरुन जप्त करण्यात आला, ही बाबच पुराव्या अभावी सिध्द होवू शकली नाही. सबब, पुराव्या अभावी आरोपीचा गुन्हा सिध्द

होत नसल्याने मी न्यायाच्या दृष्टीने मुद्दा क्र.१ च्या बाबतीत नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

## मुद्दा क्र.२ बाबत

५. अभियोगपक्षाने आरोपीचा गुन्हा शाबीत करण्यासाठी सबळ, विश्वसनीय व संयुक्तीक पुरावा सदरच्या खटल्यामध्ये आणलेला नाही. त्यामुळे आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होत नसल्याने तो निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो.

६. जप्त मुद्देमाल जागीच नाश केल्यामुळे त्याच्या विल्हेवाटीबाबत वेगळा आदेश करण्याची गरज नाही. सबब, मुद्दा क्र.२ चे अनुषंगाने पुढील अंतीम आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२५५(१) अन्वये महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियम,१९४९ चे कलम–६५ (ई) या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येते.
२. आरोपीच्या जमानतीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.
३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–४३७(अ) प्रमाणे स्वतःचे रु. २५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र दाखल करुन पुर्तता करावी.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

(वाय. एस. काणे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.२) आर्वी, जि.वर्धा.

दिनांक : ०६.०२.२०२४

## **Certificate**

I affirm that the contents of this PDF Judgment are same word to word, as per the original Judgment.

Viki P. Langote,
Stenographer (Gr.3),